# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरुवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०१६

## (सकाळी १०.०० ते ११.०० वाजेपर्यंत)

**(बुधवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री. माणिकराव ठाकरे,** धनंजय मुंडे, शरद रणपिसे, सुनिल तटकरे, नारायण राणे, हेमंत टकले, संजय दत्त, जयंत पाटील, सुभाष झांबड, सतिश चव्हाण, अशोक ऊर्फ भाई जगताप, रामराव वडकुते, ॲड.रामहरी रुपनवर, सर्वश्री. प्रकाश गजभिये, चंद्रकांत रघुवंशी, जयवंतराव जाधव, प्रा.जोगेन्द्र कवाडे, सर्वश्री.संदिप बाजोरिया, अब्दुल्लाखान दुर्राणी, आनंदराव पाटील, विक्रम काळे, अमरनाथ राजूरकर, अनिल भोसले, सतेज ऊर्फ बंटी पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.नरेंद्र पाटील, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री. अनिल तटकरे, हरिसिंग राठोड, ख्वाजा बेग, जगन्नाथ शिंदे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव - (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर) -**

"राज्यात ३ ते ४ वर्षापासून अनियमित पावसामुळे महाराष्ट्रातील विशेषत: विदर्भ, मराठवाडा व महाराष्ट्रातील अन्य दुष्काळी भागात होत असलेली सततची नापीकी, तसेच शेतमालाला भाव न मिळणे, यामुळे शेतकऱ्यांची खालावलेली आर्थिक स्थिती, परिणामी मोठ्या प्रमाणात होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या, यावर्षी खरीप हंगामात आर्थिक दृष्ट्या शेतकरी प्रचंड अडचणीत सापडणे, या परिस्थितीत बँकांना पुनर्गठनाचे शासनाने सूचित करुनही शेतकऱ्यांना कर्ज न मिळणे, मोठ्या प्रमाणात शेतकरी कर्जापासून वंचित असणे, शेतकऱ्यांनी काढलेल्या विम्याचा पुरेसा लाभ न होणे, ५० टक्क्यापेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावांना शासनाने मदत जाहिर करुनही आर्थिक मदत न मिळणे, त्यातच विमा कंपन्यानी प्रिमियमचे वाढविलेले दर, विम्याच्या प्रिमियममधून अल्पभूधारकांना सवलती पासून वंचित ठेवणे, चालू वर्षी खरीप हंगामाकरिता बियाणांचा तुटवडा, वाढलेले दर त्यातच अनेक कंपन्यानी निकृष्ट दर्जाच्या बियाणांची केलेली विक्री, चालू हंगामात विम्याची रक्कम भरण्याची अंतिम मुदत ३१ जुलै पर्यंत असल्याने ती वाढविण्याची असलेली गरज, या सर्व परिस्थितीमुळे शेतकऱ्यांची खालावलेली आर्थिक परिस्थिती पाहता व शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे वाढलेले प्रमाण लक्षात घेता राज्यातील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्ज

माफी याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

## (सकाळी ११.०० ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) -**

**(बुधवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना) — (अनुक्रमांक (१) ते (३)) -**

(१) **सर्वश्री. किरण पावसकर,** प्रभाकर घार्गे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नॅशनल हायवे ॲथोरीटी ऑफ इंडिया (NHAI) ने रिलायन्सला २०१० मध्ये पुणे सातारा राष्ट्रीय महामार्ग सहापदरी करण्याचे काम देण्यात येणे, सदर काम रिलायन्सने वेगवेगळ्या ठेकेदारांना दिलेले असणे, त्यामधील रोडवेज सोल्युशन प्रायव्हेट लिमीटेड च्या ठेकेदारास अजिंक्यतारा ते वेळे येथील विद्युत पोल व ट्रान्सफॉर्मर शिप्ट (Utility Shifting) करण्याचे काम तसेच शिवापुर टोल नाक्यापर्यंतचे रस्ता रुंदीकरणाचे काम दिलेले असणे, सदर ठेकेदाराने रिलायन्सच्या संगनमताने विद्युतीकरणाच्या कामामध्ये प्रत्यक्षात काम न करता खोटी बिले सादर करुन NHAI कडून अंदाजे रक्कम रुपये २७ कोटी घेतलेले असणे, विद्युत खांब शिप्ट न झाल्यामुळे रस्ता रुंदीकरणाचे काम प्रलंबित असणे, या सर्व परिस्थितीमुळे मागील ४ वर्षात १०० हुन अधिक लोकांचे बळी गेलेले असणे, त्यामुळे त्यांची जबाबदारी रिलायन्स व रोडवेज सोल्युशन प्रायव्हेट लिमीटेड यांच्यावर असणे, संबंधीत ठेकेदारांना शिरवळ ते शिवापुर रस्ता रुंदीकरणाचे काम देण्यात आले असता त्या कामामध्ये सुध्दा काम न करता बऱ्याच ठिकाणची बिले घेण्यात आलेली असणे, त्यामुळे दिनांक ३ मे, २०१६ रोजीच्या रस्त्याच्या डिझाईनप्रमाणे रुंदी नसल्यामुळे नसरापूर येथे एका जीपचा अपघात होऊन चौघाजणांचा मृत्यू होणे, सदर ठेकेदारास रिलायन्सने दिनांक ३० डिसेंबर, २०१५ रोजी टर्मिनेट करणे त्यामुळे गेले ८ महिने शिरवळ ते शिवापुर पर्यंत रिलायन्सचे काम बंद असणे, त्यामुळे बरेचसे अपघात होत असणे, तसेच पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गाच्या पैशाचा संगनमताने रिलायन्स व त्यांचे कॉन्ट्रॅक्टरकडून होत असलेल्या अपहाराकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

(२) **श्री. धनंजय मुंडे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सी.टी.एस.नंबर १९५ पैकी मौजे अंधेरी व सी.टी.एस. नंबर ३० पैकी व ३१ पैकी मौजे जुहू, मुंबई येथील शिवशाही प्रकल्पांतर्गत झालेल्या कामात भ्रष्टाचार, शासनाची व सदनिका धारकांची फसवणूक झाल्याची बाब जुलै, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास येणे, सदर प्रकल्पाचे काम करणाऱ्या विकासक किरण हेमानी यांच्या मे.बॉम्बे स्लम रिडेव्हलपमेंट कॉ.लि. यांनी सन १९९६-९७ साली शिवशाही प्रकल्पांतर्गत १. लोकनायक नगर एसआरए को.ऑप.हौ.सो.लि., २. शिवाजीनगर एसआरए को.ऑप.हौ.सो.लि. व ३. न्यु कपासवाडी, एकतासेवा मंडळ एसआरए को.ऑप. हौ.सो.लि. (तिन्ही सोसायट्यांच्या एकत्रित क्षेत्रफळ ५९००० चौ.मी.) च्या कामामध्ये १०१८ एस.आर.ए. च्या सदनिका झोपडपट्टी धारकांना बांधून देण्याच्या प्रकल्पात तसेच किरण हेमानी यांच्या मे.आर.के.डेव्हलपर्स या कंपनीने सीटीएस नं. १९५ पैकी सर्व्हे नं. १०६, १०६ अ मौजे अंधेरी, मुंबई येथील डी.एन. नगर शितलादेवी एसआरए को.हौ.सो.लि.(क्षेत्रफळ १८५०० चौ.मी.) च्या पुनर्वसन प्रकल्पातील कामामध्ये ८१७ एसआरएच्या सदनिका झोपडपट्टी धारकांना बांधून देण्याच्या पुनर्वसन प्रकल्पात भ्रष्टाचार होणे, १५ वर्षापूर्वी सदर विकासकाने हे प्रकल्प पूर्ण करण्याकरिता शिवशाही प्रकल्पांतर्गत १३४ कोटी रुपये विनाव्याज रक्कम शासनाकडून घेतलेले असणे, सदर प्रकल्पातील विस्तापितांना राहण्याकरिता शासनामार्फत संक्रमण शिबीर बांधण्याकरिता भूखंड भाडेतत्वावर घेतलेला असणे, सदर भाड्याची रक्कम आतापर्यत १५ कोटी रुपये होऊनदेखील विकासकाकडून अद्याप प्रकल्पाकरिता बिनव्याजी घेतलेले १३४ कोटी रुपये तसेच भाड्याची रक्कम १५ कोटी रुपये शासनास परत केलेले नसणे, सदर शासनाने दिलेली रक्कम वसूल करण्याकरिता प्राधिकरणातील अधिकाऱ्यांमार्फत कोणतीही ठोस कारवाई करण्यात न येणे, सदर विकासकाने सध्या जागेवर फक्त ७७७ सदनिका बांधलेल्या असून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणच्या नोंदणीमध्ये केवळ ६२३ सदनिकांची नोंद केलेली असणे, यामध्ये प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात अनियमितता केलेली असणे, सदर प्रकल्पात विकासकामार्फत मूळ ३५० झोपडीधारकांना सदनिका वितरीत करणे व उर्वरित सदनिका विकासकाने प्रकल्पामध्ये बाधित नसलेल्या व्यक्तींना विक्री केलेल्या असणे, याकडे प्राधिकरणातील अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केलेले असणे, सदर विकासकाने या प्रकल्पाप्रमाणे मुंबईत इतर ठिकाणीही प्रकल्प हाती घेतलेले असून त्यामध्येही मोठ्या प्रमाणात अनियमितता केलेली असणे, विकासकाने सदर प्रकल्पामध्ये आपल्या अनेक नातेवाईकांना नियमबाह्यरित्या सदनिका वितरीत केलेल्या असणे, याबाबतीत

झोपडीधारकांमध्ये निर्माण झालेला प्रचंड असंतोष, झोपडीधारकांना घरे मिळण्यास विलंब होत असल्याच्या कारणाने विकासक बदलण्याची मागणी तेथील राहणाऱ्या दोन्ही प्रकल्पातील चारही सोसायट्यांनी उच्चाधिकारी समितीकडे केलेली असणे, या अनियमिततेबाबत उपरोक्त प्रकल्पातील तीन सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांनी आर्थिक गुन्हे शाखा यांच्याकडे तक्रार केलेली असणे, सदर प्रकल्पातील दोषी असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील दोषी अधिकाऱ्यांवर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नसणे, सदर प्रकल्पात १००० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचा झालेला गैरव्यवहार, शासनाची फसवणूक यामुळे विकासक बदलण्याची व दोषींवर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, या सर्व प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(३) **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील घाटकोपर (पश्चिम) येथे पंखेशाह बाबा (एस.आर.ए.) नियोजित को.ऑप.हौ.सोसायटी नं भू.क्र. १५१ पार्ट (१ ते ६) या प्रकल्पात विकासकाने मोठ्या प्रमाणात गैरप्रकार, अनियमितता केली असल्याचे माहे जुलै, २०१६ दरम्यान निदर्शनास आले असणे, विकासक रॉकलाईन प्रॉपर्टीज ॲण्ड डेव्हलपर्स प्रा.लि यांनी उपनगरी जिल्हाधिकारी यांच्या मदतीने अंदाजे १५० बोगस झोपडीधारक तयार केले असणे, एस.आर.ए प्रकल्पासाठी ७० टक्के संमती आवश्यक असताना सदरचा आकडा मिळविण्यासाठी विकासक यांनी २९ नावे समाविष्ट केलेली असणे, ज्यांनी आपली संमती या प्रकल्पासाठी दिली नाही त्यांनाही सदर प्रकल्पात पात्र म्हणून घोषित केलेले असणे, तसेच दर्गा-मस्जिदची मालमत्ता अतिक्रमण करुन न्यायालयाचा अपमान केलेला असणे, या डेव्हलपर्स कंपनीवर कारवाई करावी अशी मागणी असतानाही शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी या कंपनीशी संबंधित झोपडीधारकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना त्यामुळे शासनाने या कंपनीची चौकशी करुन करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री. नारायण राणे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये दिनांक ५ एप्रिल, २०१६ रोजी अधिसूचना प्रसिद्ध करून राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने मालाड पूर्व येथील सर्वे क्रमांक ३२९ /१(हिस्सा) सीटीएस क्र. ८२७A/४A/२ येथील ८०,९३४ चौरस मीटर वन विभागाला लागून असणारे क्षेत्र "ना-विकास" विभागातून रहिवासी

विभागात बदलण्यासाठी मागविलेल्या सूचना व हरकती, पोलीसांच्या घरांसाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे खाजगी मालकीची जमीन "ना-विकास" क्षेत्रातून रहिवासी विभागातून आणण्यास पर्याय राहिलेला नाही असे अधिसूचनेत नमूद करण्यात आलेले कारण, राज्य तसेच केंद्र शासनाच्या व विविध उपक्रमांच्या ताब्यात "ना-विकास" विभागातील बरेच क्षेत्र उपलब्ध असताना, मुंबई पोर्ट ट्रस्टच्या १८०० एकर जमिनीच्या विकास प्रकल्पातून मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त क्षेत्र उपलब्ध होत असताना कोणत्याही प्रकारे लिलाव पध्दतीचा किंवा बोली पध्दतीचा अवलंब न करता अपारदर्शक पद्धतीने विशिष्ट खाजगी व्यक्तींना प्रचंड मोठा लाभ मिळवून देणारा मालाड येथील ना-विकास विभाग रहिवासी विभागात आणण्याचा होत असलेला शंकास्पद व्यवहार, या व्यवहारामधून खाजगी व्यक्ती व विकासकांचे उखळ पांढरे करुन देण्याचा प्रयत्न होत असल्याची जनतेची भावना, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री. विक्रम काळे,** सतिश चव्हाण, डॉ. सुधीर तांबे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शालेय शिक्षण विभाग, सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विभाग अंतर्गत मोठ्या संख्येने प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व आश्रमशाळा असणे, या शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांसाठी सेवाशर्ती नियमावली व कायदा असणे, त्यानुसार विद्यार्थी संख्या कमी झाल्यामुळे एखादा कायम सेवेत असलेला शिक्षक-कर्मचारी अतिरिक्त ठरल्यास त्याचे इतर शाळेत समायोजन करुन त्याच्या वेतनास संरक्षण देण्यात येते अशी नियमात तरतूद असताना उपरोक्त तिन्ही विभागानी अल्पसंख्यांक शाळा व आश्रमशाळांमधील शिक्षक अतिरिक्त ठरल्यास त्याचे समायोजन होईपर्यंत त्यास वेतन देण्यात येऊ नये म्हणून "नो वर्क नो पे" असा अन्यायकारक निर्णय घेणे, यामुळे कायम सेवेत असलेल्या शिक्षकावर अन्याय होऊन परिणामी त्यांचे वेतन स्थगित होणे, २०-२० वर्षे सेवेत असलेल्या शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या सेवेवर व वेतनावर प्रश्नचिन्ह निर्माण होणे, यामुळे राज्यातील शिक्षक-कर्मचाऱ्यांमध्ये गोंधळाची व असंतोषाची भावना निर्माण होणे, राज्यभर या विषयी शिक्षक-कर्मचाऱ्यांनी आंदोलने करणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री. दत्तात्रय सावंत,** ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री.प्रभाकर घार्गे, कपिल पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"उच्च माध्यमिक स्तरावर माहिती तंत्रज्ञान हा विषय दिनांक ५ जुलै, २००१ च्या शासन आदेशान्वये अभ्यासक्रमात समावेश करणे, माहिती तंत्रज्ञान हा विषय भाषा ऐवजी किंवा ४ विकल्पिक विषयांपैकी विषय म्हणून निवडता येईल असे स्पष्ट आदेश निर्गमित होणे, सदर विषयास आठवड्याला प्रति तुकडी ८ तासिका विहीत करणे, पूर्ण वेळ शिक्षकाला आठवड्याला १८ घड्याळी तास, अर्धवेळ शिक्षकाला ९ घड्याळी तास प्रचलित नियमानुसार तयार करणे, या नियुक्त्या करताना विहीत केलेले आरक्षण व विहित केलेली शैक्षणिक अर्हता याचा विचार करुन विभागीय शिक्षण उपसंचालकांद्वारे राज्यात एकूण पूर्ण वेळ ३५६, अर्ध वेळ १३३ व तासिका तत्वावर ७८ मान्यता देणे, अनुदानित उच्च माध्यमिक शाळेस माहिती तंत्रज्ञान हा विषय अनुदानित म्हणून मंजूर करण्यासाठी संचालक, महाराष्ट्र राज्य शिक्षक संचालनालय यांनी शिफारस करणे, उच्च माध्यमिक शाळेचा कायम शब्द काढणे, महाराष्ट्र शासनाच्या SARAL, KALCHACHANI, ICT, HSC/SSC ONLINE माहिती भरण्यास आय टी शिक्षकांना तज्ञ शिक्षक म्हणून मान्यता देणे, असे असताना माहिती तंत्रज्ञान विषयाचा कायम शब्द न काढणे, गेली १६ वर्षे या शिक्षकांच्या वेतनाची तरतूद न करणे, त्यामुळे संबंधित शिक्षकांच्या मनामध्ये असंतोष निर्माण होणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(७) **सर्वश्री. धनंजय मुंडे,** अमरसिंह पंडित, सुनिल तटकरे, सतिश चव्हाण, नरेंद्र पाटील, अब्दुल्लाखान दुर्राणी, जयवंतराव जाधव, हेमंत टकले, रामराव वडकुते, अ‍ॅड. अनिल परब, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मे. ओमकार रिअलटर्स व डेव्हलपर्स प्रा.लि. या विकासकाकडून मुंबईच्या परेल शिवडी डिव्हिजन येथील नभूक्र. ७९५, ६५७, ६५६,७९७, ६५४, ४३२, ६५६, ६५९, ६५३, ४४०, ४३७, ८५४, ६६९,८७०, ८७१ (भाग) तसेच दादर नायगाव डिव्हिजन येथील नभूक्र. १५५, १७४, १७६, १/१७७, १८५, १०३८, १०३९ या भूखंडावर १० सोसायट्यांचे एकत्रिकरण करून झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत विकास करण्यात येत असणे, तेथील झोपडपट्टीधारकांना विश्वासात न घेता विकासकाने परस्पर मनपा अधिकाऱ्यांना हाताशी धरुन भूखंडाच्या आरक्षणात बदल करून घेणे, यामध्ये विकासक व मनपा अधिका-यांमध्ये छुपी युती असणे, बदलून घेतलेल्या आरक्षणात सध्या उद्यानाच्या भूखंडावर झोपडपट्टीधारकांचे वास्तव्य असणे, त्याच ठिकाणी पुनर्वसन करण्याची झोपडपट्टी धारकांची मागणी असणे, तसे न झाल्यास झोपड्या खाली करण्यात येणार नाहीत अशी सूचना झोपडपट्टी धारकांनी देणे, विकासक करणार असलेल्या दूरच्या

ठिकाणी झोपडीधारकांचा स्थलांतरीत होण्यास नकार असणे, विकासकाकडून मुळ उद्यानासाठी असलेल्या भूखंडावर विक्रीकरीता इमारत उभारणीचे काम करणे, विकासक उद्यान नेमके कोठे उभारणार याबाबत झोपडपट्टीधारकांमध्ये निर्माण झालेली संभ्रमावस्था, शाळेसाठी १३२४ चौ.मी. एवढी जागा आरक्षित असतानाही शाळेचे बांधकाम करण्यात न येणे, अवघ्या दोन ते तीन खोल्यांमध्ये शाळा चालवण्यात येत असणे, २३ बालवाड्या, २३ कल्याण केंद्रे, २३ सोसायटी यांना कार्यालये देण्यात न येणे, याबाबत तेथील झोपडीधारकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत विकासक व संबंधित अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(८) **श्री. प्रभाकर घार्गे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"संपूर्ण राज्यात आर्थिक मंदीमुळे उद्योजकांमध्ये अतिशय उदासीन वातावरण असणे, नवीन उद्योजकांना संधी उपलब्ध नसणे, अखंड महाराष्ट्र असताना विज दरामध्ये तफावत ठेवणे, यामुळे प्रादेशिक असंतोष निर्माण करुन केलेली विषमता, त्यामुळे ठराविक विभागामधीलच उद्योजकांना चालना मिळून अन्य विभागामधील उद्योजकांवर आलेले संकट, स्टील उद्योगात मोठ्या प्रमाणावर आलेली मंदी, नवीन उद्योगांसाठी औद्योगिक क्षेत्रात पायाभूत सुविधांचा असलेला अभाव, यामुळे उद्योजकांमध्ये असंतोषाची भावना वाढीस लागणे, गेल्या ५ वर्षात एम.आय.डी.सी.ने उद्योग विकासासाठी कोणतेही ठोस पाऊल उचलले नसल्याने स्थानिक उद्योगाचे झालेले खच्चीकरण, त्यामुळे साध्या परवानग्या देखील मिळवण्याकरीता मुख्य कार्यालयात करावी लागणारी ये-जा, विलंब, छोट्या उद्योगांना लांबलचक कार्यपध्दतीमुळे होणारा नाहक त्रास, परिणामी उद्योजकांमध्ये पसरलेले संतापाचे वातावरण, यामध्ये संबंधीत परवानग्या (भूखंड हस्तांतरण करणे, भागीदारी रद्द करणे, सभासदत्व रद्द करणे व इतर बाबी) या सर्वबाबत संबंधित प्रादेशिक कार्यालयास अधिकारी देणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(९) **श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **वस्त्रोद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"देशात कृषी व्यवसायानंतर वस्त्रोद्योग हा सर्वात मोठा व्यवसाय असून देशातील एकूण वस्त्रोद्योग व्यवसायापैकी ५० टक्के व्यवसाय एकट्या महाराष्ट्र राज्यात असणे, या व्यवसायातून राज्यातील सुमारे ८० लक्ष लोकांना रोजगार मिळणे तसेच या व्यवसायापासून शासनाला मोठया

प्रमाणात आर्थिक उत्पन्न मिळत असणे, राज्यातील भिवंडी, मालेगांव, इंचलकरंजी, सोलापूर, धूळे, कामठी, नागपूर व कराड येथे पॉवरलुम सेंटर्स असणे, या शहरातील लोकांचा मुख्य व्यवसाय वस्त्रोद्योग असून शासनाचे आयात निर्यात धोरणामुळे या व्यवसायावर मंदीचे सावट असणे, शासनाच्या आयात निर्यात धोरणामुळे या व्यवसायातील मालाचा दर स्थिर व निश्चित रहात नसणे म्हणून सदर व्यवसायातील पॉवरलुम मालकांना मोठे नुकसान सोसावे लागत असणे, परिणामी पॉवरलुम क्षेत्रात काम करणाऱ्या लाखो कामगारांची बेरोजगारीमुळे होत असलेली उपासमारी, त्यामुळे पॉवरलूम मालक व यामधील कामगारांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, पॉवरलुम उद्योगाच्या विविध समस्यांकडे राज्य शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने राज्यातील सर्व पॉवरलुम धारक यांनी आझाद मैदान, मुंबई येथे दिनांक २० जुलै २०१६ रोजी धरणे आंदोलन करण्याचा दिलेला इशारा, याबाबत राज्य शासनाने तातडीने धोरणात्मक निर्णय घेऊन पॉवरलुम व्यवसायावर आलेले संकट दूर करण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(दुपारी १.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे -**

(क) **तारांकित प्रश्न.**

(ख) **तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** : "**राज्यातील दुष्काळी गावांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**" या विषयावरील श्री.नागो गाणार व इतर वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३६९४६ ला दिनांक १५ एप्रिल, २०१३ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(ग) **मंगळवार, दिनांक २६ जुलै व बुधवार, दिनांक २७ जुलै, २०१६ तसेच सोमवार, दिनांक १ ऑगस्ट व मंगळवार, दिनांक २ ऑगस्ट, २०१६ रोजींच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

(घ) **अतारांकित प्रश्नोत्तरांची सहावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.**

(क) **मुख्यमंत्री** : (१) लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे सन २०११ या वर्षाचा ३९ वा आणि सन २०१२ या वर्षाचा ४० वा वार्षिक अहवाल तसेच दिनांक १८ डिसेंबर, २०१०, दिनांक १६

एप्रिल, २०१२, दिनांक १६ एप्रिल, २०१२, दिनांक ६ नोव्हेंबर, २०१२, दिनांक २१ नोव्हेंबर, २०१२, दिनांक १ डिसेंबर, २०१२, दिनांक २ जानेवारी, २०१३, दिनांक ८ जानेवारी, २०१३, दिनांक ८ जानेवारी, २०१३, दिनांक २८ मार्च, २०१३, दिनांक ५ जून, २०१३, दिनांक ८ जुलै, २०१३, दिनांक १० जुलै, २०१३, दिनांक १५ जुलै, २०१३, दिनांक १९ ऑगस्ट, २०१३, दिनांक ३० ऑगस्ट, २०१३, दिनांक १९ सप्टेंबर, २०१३, दिनांक ७ ऑक्टोबर, २०१३, दिनांक १९ डिसेंबर, २०१३, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१४, दिनांक २० मार्च, २०१४, दिनांक २० मार्च, २०१४, दिनांक २१ मार्च, २०१४, दिनांक २१ मार्च, २०१४, दिनांक ७ एप्रिल, २०१४, दिनांक २२ एप्रिल, २०१४, दिनांक २८ एप्रिल, २०१४, दिनांक २८ एप्रिल, २०१४, दिनांक ३० एप्रिल, २०१४, दिनांक ३० एप्रिल, २०१४, दिनांक ३० एप्रिल, २०१४, दिनांक ५ मे, २०१४, दिनांक ४ जून, २०१४, दिनांक ६ जून, २०१४, दिनांक २३ जून, २०१४ रोजीचे ३५ विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह" सभागृहासमोर ठेवतील.

**(२)** "मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा अठ्ठावीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख) नियोजन मंत्री** : "महाराष्ट्र पाटबंधारे वित्तिय कंपनी मर्यादित यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : **(१)** "उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा पंचवीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(२)** "सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

| | | | |
|---|---|---|---|
| | | | **(३)** "राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |
| **(घ)** | **सांस्कृतिक कार्य मंत्री** | : | "महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा अडतीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |
| **(ङ)** | **महिला व बालविकास मंत्री** | : | "महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांचे सन २०१३-२०१४ ते २०१४-२०१५ या वर्षांचे स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |
| **(च)** | **अन्न व औषध प्रशासन मंत्री** | : | "हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ मर्यादित यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा अडतीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |
| **(छ)** | **उद्योग मंत्री** | : | "कोंकण विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |
| **(ज)** | **कृषि मंत्री** | : | "डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचे सन २००८-२००९, २००९-२०१० व २०१०-२०११ या वर्षांचे लेखा परिक्षण अहवाल व वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील. |
| **(झ)** | **पर्यावरण मंत्री** | : | "महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचा सन २०१३-२०१४ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |
| **(ट)** | **ऊर्जा मंत्री** | : | "महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा दहावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |
| **(ठ)** | **सामाजिक न्याय मंत्री** | : | "संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २००९-२०१० ते २०१२-२०१३ या वर्षाचा अनुक्रमे छत्तीसावा, सदतीसावा, अडतीसावा व एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |
| **(ड)** | **पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री** | : | **(१)** "पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१२-२०१३ चौतीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |
| | | | **(२)** "महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित, |

मुंबई यांचे सन २०१३-२०१४ व २०१४-२०१५ या वर्षांचे वैधानिक लेखा परिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(ढ) **कौशल्य विकास मंत्री** : "अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २००९-२०१० व २०१०-२०११ चा अनुक्रमे बारावा व तेरावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : "सार्वजनिक उपक्रम समितीचा नववा अहवाल व दहावा अनुपालन अहवाल सादर करणे."**

**चार : "विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा नववा व दहावा अहवाल सादर करणे."**

**पाच : "विधानपरिषद सदस्य अनुपस्थिती समिती (२०१५-२०१६) चा तिसरा अहवाल सादर करणे व त्यावर विचार करणे."**

**सहा : (क) म.वि.प.नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने — असल्यास.**

**(ख) म.वि.प.नियम ९३ अन्वये सूचेनसंदर्भातील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे -**

**कामगार मंत्री** : **"१० लाखांपेक्षा अधिक बांधकाम खर्च असणाऱ्या बांधकाम व्यवस्थापकांकडून बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे या कामगारांच्या हितासाठी रक्कम जमा करावी लागणे बंधनकारक असताना काही बांधकाम व्यावसायिकांनी जमा केलेले धनादेश न वठल्याचे कॅगच्या अहवालात नमुद करणे**" या विषयावरील श्री.जगन्नाथ शिंदे, वि.प.स. यांच्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेच्या अनुषंगाने दिनांक २२ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या आश्वासनानुसार माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**सात : म.वि.प. नियम १०१ - अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

# - मध्यंतर -

**आठ : शासकीय विधेयके —**

**(क) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

**(१) "सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २६ - महाराष्ट्र महानगरपालिका**

**आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१६"**

(अ) **विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २६ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या १२ सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ब) **विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.प्रकाश गजभिये, शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २६ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या १० सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(२) **"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३२ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण विधेयक, २०१६"**

(अ) **विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३२ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या १२ सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ब) **विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३२ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या १० सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा**

**महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(३) **"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३१ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१६"**

(अ) **विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३१ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या १२ सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ब) **विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३१ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या १० सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(४) **"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २८ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २८ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या १० सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(५) **"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३७ - महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) विधेयक, २०१६"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद**

**रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३७ - महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या १० सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(६) "सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २४ - महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन)(सुधारणा) विधेयक, २०१६"**

**(अ) विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २४ - महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन)(सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या १२ सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ब) विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २४ - महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन)(सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या १० सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(क) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २४ - महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन)(सुधारणा) विधेयक, २०१६ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहाच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(७) "सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३८ - महाराष्ट्र निरसन विधेयक, २०१६"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद**

**रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३८ - महाराष्ट्र निरसन विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या १० सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---------------------------------------------------------------

**(ख) विधानसभेने संमत केल्यास - विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ४० - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (चौथी सुधारणा) विधेयक, २०१६"**

---------------------------------------------------------------

**(ग) विधानसभेने संमत केल्यास — विधेयक विचारात घेणे.**

**"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३९ - महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक, २०१६"**

---------------------------------------------------------------

**(घ) विधानसभेने दुसऱ्यांदा संमत केल्यास - विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१६"**

---------------------------------------------------------------

**नऊ** : **सर्वश्री.धनंजय मुंडे,** नारायण राणे, सुनील तटकरे, शरद रणपिसे, हेमंत टकले, माणिकराव ठाकरे, किरण पावसकर, अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री.संजय दत्त, जयंत पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री.जनार्दन चांदूरकर, सतीश चव्हाण, अमरनाथ राजूरकर, आनंद ठाकूर, आर्कि. आनंदराव गाडगीळ, श्री.अनिल भोसले, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री. जयवंतराव जाधव, सुभाष झांबड, जगन्नाथ शिंदे, सतेज ऊर्फ बंटी पाटील, ॲड. राहुल नार्वेकर, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री.नरेंद्र पाटील, चंद्रकांत रघुवंशी, संदिप बाजोरिया, ॲड.रामहरी रुपनवर, प्रकाश गजभिये, श्रीमती हुस्नबानू खलिफे, सर्वश्री.ख्वाजा बेग, हरिसिंग राठोड, विक्रम काळे, रामराव वडकुते, ॲड. जयदेव गायकवाड, **वि.प.स. यांचा म.वि.प.नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव -**

"देशाची आर्थिक राजधानी तथा महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबई शहरात महानगरपालिकेतर्फे करण्यात येणाऱ्या विविध कामांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला असणे, मनपाच्या विविध विभागातील नालेसफाई, मीठी नदीचा गाळ काढणे, रस्ते, आरोग्य, शिक्षण यासह सर्व विभागात निकृष्ट दर्जाची कामे व भ्रष्टाचार झालेला असणे, अनेक विभागात कामे देताना व

करताना भ्रष्टाचार झाल्याचे उघड होणे, शहरात कचऱ्याची विल्हेवाट योग्य पध्दतीने लागत नसणे, डंम्पींग ग्राऊंडच्या कामात होत असलेला विलंब व भ्रष्टाचार, भुयारी गटारे व डंम्पींग ग्राऊंडच्या कामात कन्सल्टींगमध्ये झालेली पैशांची उधळपट्टी, होत असलेला विलंब व भ्रष्टचार, स्मार्ट सिटीची फसवी घोषणा, मनपातील इमारत प्रस्ताव विभागातील व प्रभागातील इमारत बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने विकासकांकडून ओसी घेतल्यावर अनधिकृत बांधकाम केले जाणे, मुंबईचा नवीन विकास आराखड्यामध्ये बिल्डरांचे हित लक्षात घेऊन सूचविलेले बदल ना विकास क्षेत्रात गृहनिर्माणासाठी एफ.एस.आय. देण्याचे प्रस्ताव, एकाच पक्षाची अनेक वर्षे सत्ता असल्याने मनमानी व भ्रष्टाचारी कामामुळे नागरी सुविधांवर होणारा परिणाम, त्यामुळे मुंबईची भकास झालेली अवस्था, ठाणे शहरातही अशीच अवस्था असणे, होर्डींग पॉलीसी व फायर पॉलीसीचे होत असलेले उल्लंघन, मुंबईतील गगनाला भिडणारी महागाई, गृह खरेदी सर्वसामान्यांच्या आवाक्या बाहेर जाणे, परवडणाऱ्या घरांबाबत शासनाकडून फसव्या घोषणा करण्यात येणे, म्हाडाच्या मोकळ्या भुखंडावरील वाढती अतिक्रमणे, नवीन गृहनिर्माण अधिनियम लागू करण्यात होणार विलंब, राज्याचा गृहनिर्माण अधिनियम डावलून केंद्राचा रिअल इस्टेट ॲक्ट, २०१६ स्विकारणे, राज्यातील मंदावलेले औद्योगिकीकरण, शासनास गुंतवणूक आकर्षित करण्यास आलेले अपयश, औद्योगिक गुंतवणूकीबाबत स्पर्धेत अनेक राज्ये महाराष्ट्र राज्याच्या पुढे जाणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**दहा** : **(बुधवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**श्री.सुजितसिंह ठाकूर,** डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, गोपिकिसन बाजोरिया, विनायक मेटे, प्रा.अनिल सोले, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती स्मिता वाघ, सर्वश्री.प्रशांत परिचारक, गुरुमख जगवानी, गिरीश व्यास, रामनाथ मोते, ॲड.अनिल परब, श्री.रविंद्र फाटक, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यात सुरू असलेली रोजगार हमी योजना संपूर्ण देशात महाराष्ट्र राज्याने प्रथम स्वीकार केली असणे, आपल्या राज्यात सदरहू योजना लोकाभिमुख व विकासाभिमुख झाल्यानंतर अशीच योजना नरेगाच्या माध्यमातून केंद्र शासनाने सर्व देशभरात लागू केली असणे, संबंधित अधिनियमाचा लाभ घेत देशातील विविध राज्यांनी या योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात विकास केला असल्याचे निदर्शनास येणे, महाराष्ट्र राज्यात मात्र ही योजना संथ गतीने सुरू असल्याचे निदर्शनास येणे, विधानमंडळाच्या रोजगार

हमी योजना समितीने सदर योजना राज्यभरात प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने अन्य राज्यांचे अभ्यास दौरे करुन व त्यांच्याकडील या योजनेचा अभ्यास करुन त्या धर्तीवर आपल्या राज्यात ही योजना अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न केला असणे, तथापि शेतकरी व मजुरांच्या रोजगाराचा प्रश्न सोडविणाऱ्या या योजनेस शासनाचे काही उच्च पदस्थ अधिकारी, ग्रामसेवक, तांत्रिक अधिकारी यांच्याकडून आवश्यक ते सहकार्य मिळत नसल्याचे निदर्शनास येणे, परिणामी अपेक्षेप्रमाणे या योजनेंतर्गत कामे होत नसल्याचे निदर्शनास येणे, राज्याच्या महात्मा गांधी रोजगार हमी योजनेस केंद्राकडून निधी उपलब्ध होत असूनही इतर राज्यांच्या तुलनेत तो खर्च होत नसल्याचे निदर्शनास येणे, सन १९९९ ते २०१० या कालावधीत राज्यात सुरू असलेल्या लॉटरीच्या माध्यमातून शासनास अपेक्षित महसूल मिळाला नसल्याची बाब निदर्शनास येणे, त्या कालावधीतील कर व इतर माध्यमातून हजारो कोटी रुपयांचे येणे आजही बाकी असल्याचे निदर्शनास येणे, विद्यमान वित्त व नियोजन मंत्र्यानी पेपरलेस प्रशासन चालविण्याच्या दृष्टीने सुरू केलेली प्रक्रिया, गतीमान प्रशासनासाठी सदर प्रक्रिया अधिक प्रभावी करण्याची आवश्यकता, राज्याच्या डोंगरी भागातील पिण्याच्या पाण्याची टंचाई, याबाबत शासनाची भूमिका व करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**अकरा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) -**

**(१) श्री.दत्तात्रय सावंत, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात विनाअनुदानित प्रलंबित अघोषित शाळा जाहिर झाल्याने शाळेमध्ये समाधानाचे वातावरण तयार होणे, प्रत्यक्षात शासन निर्णय वाचल्यानंतर निराशा होणे, राज्यामधील कायम विनाअनुदानित शाळेचा कायम शब्द काढण्याबाबत मंत्रीमंडळात निर्णय होणे, त्यानुसार उच्चस्तरीय सचिवांच्या समितीने दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ रोजी अनुदानाचे सुत्र जाहीर करणे, त्याप्रमाणे मुल्यांकन करणे, काही शाळा पात्र करुन अनुदान देणे, राहिलेल्या शाळाही पात्र करणे, बाकी शाळा पात्र करताना मात्र अनुदान सुत्र तेच असताना दिनांक १ व २ जुलै, २०१६ च्या पात्र शाळांच्या बाबतीत टप्पा जाहीर न करणे, मंत्रीमंडळ ठरावान्वये अनुदान देण्यासाठी काढलेले शासन आदेश असताना १५ वर्षे विनावेतन सेवा करणाऱ्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कोणताच टप्पा जाहीर न करणे, त्यामुळे अनुदानासाठी पात्र घोषित होऊनही संबंधित शाळेतील विद्यार्थी विविध लाभासाठी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वेतनासाठी संभ्रमित झाले असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर**

**चर्चा उपस्थित करतील.**

"औरंगाबाद महापालिका अंतर्गत ७७ शाळा कार्यरत असून त्यापैकी ५० शाळेला खेळाचे मैदान नसणे, महापालिकेच्या शाळांमध्ये शहरातील गोरगरीब जनतेची मुले/मुली शिक्षण घेत असून या शाळांमध्ये क्रीडा शिक्षण देणेसाठी फक्त ६ क्रीडा शिक्षक असणे, महापालिकेच्या प्रत्येक शाळेत क्रीडा शिक्षकांची नेमणूक करुन देण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : ३ ऑगस्ट, २०१६.**

**उत्तमसिंग चव्हाण,**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**